**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीमधील तक्ता क्र. १९मधील फेरबदल मंजूरीची कलम ३७(२) खालील अधिसूचना.

## महाराष्ट्र शासन
**नगर विकास विभाग**
**क्रमांक :- टिपीबी** ४३१७ /७०३/ **प्र.क्र.** २०३/ २०१७/ **नवि**-११
**मंत्रालय, मुंबई** :४०० ०३२,
**दिनांक – २२ मार्च, २०१८**

**शासन निर्णय :** सोबतची अधिसूचना शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( प्रदीप गोहिल )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

**प्रति,**

(१) **प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई**-३२.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
(३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(४) सह सचिव, तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(५) मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
(६) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविण्यात याव्यात.)
(७) अवर सचिव, नवि-१३, ३०.
(८) कक्ष अधिकारी, नवि-९, १२.
(९) कक्ष अधिकारी, कार्यासन माहिती व तंत्रज्ञान विभाग( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. )
(१०) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**
**Sanctioned Modification under Section 37(2) to Table No.19 of Revised Development Control Regulations of M.I.D.C. Notified Area.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development department,**
**Mantralaya, Mumbai 400032.**
**Date :- 22nd March, 2018.**

**NOTIFICATION**

**No.TPB 4317/703/CR-203/2017/UD-11**

Whereas, the Maharashtra Industrial Development Corporation is deemed to have been appointed as the Special Planning Authority (hereinafter referred to as "the said Corporation"), by virtue of the provisions of sub section 1A of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") over any area where Chapter VI of the Maharashtra Industrial Development Act, 1961 applies or any other area comprising government land transferred to the Maharashtra Industrial Development Corporation;

And whereas, the said Corporation has revised the Development Control Regulations (hereinafter referred to as "the said Revised Regulations ") which have been sanctioned by the Government in the Urban Development Department vide Notification No.TPB4308/465/CR-64/08/UD-11, dated 31st August 2009 so as to take effect from 24th September 2009;

And whereas, the said Corporation in its Board Meeting No. 369, dated 27th February 2017, vide Resolution No. 5644 has decided to amend Table of the said Revised Regulations in respect of parking norms for Biotechnology park and Information Technology Park and submitted a modification proposal vide letter dt. 23rd August 2017 to the Govt. for its sanction, after completing the legal procedure under Section 37(1) of the said Act, (hereinafter referred to as “the proposed modification”);

And whereas, after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the proposed modification should be sanctioned ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of the Section 37 of the said Act, the Government hereby:-

A) Sanctions the proposed modification, as described more specifically in the Schedule mentioned below and the final decision in case of Information Technology and Nano technology is kept in abeyance and will be notified separately.

B) Fixes the date of publication of this Notification in the Official Gazette as the date of coming into force of this modification.

URBAN DEVELOPMENT DEPTT ★ MANTRALAYA MUMBAI-32 ★ सत्यमेव जयते

C) Directs the Maharashtra Industrial Development Corporation that in the Schedule of Modifications sanctioning the said Revised Regulations, after the last entry, the Schedule referred to at (A) above shall be added.

**SCHEDULE**

<table>
<tr><th colspan="3">Existing Provision</th><th colspan="3">Sanctioned Provision</th></tr>
<tr><th colspan="3">Table 19</th><th colspan="3">Table 19</th></tr>
<tr><th>Sr. No.</th><th>Land Use</th><th>Car Spaces</th><th>Sr. No.,</th><th>Land Use</th><th>Car Spaces</th></tr>
<tr><td rowspan="2">6</td><td rowspan="2">Information Technology, Biotechnology and Nano Technology</td><td rowspan="2">One Space for every 50 Sq m of floor area or part thereof</td><td>6</td><td>Biotechnology</td><td>One space for every 100 sq m of floor area or part thereof</td></tr>
<tr><td colspan="3">In case of Information Technology & Nano Technology, the final decision is kept in abeyance.</td></tr>
</table>

Note:- The parking norms for Datacenter activity shall be as per clause 11 of table 19, i.e. as per storage activity.

A copy of this Notification shall be made available for inspection for a period of one month at the following offices :--

A) Director ,Town Planning, Maharashtra State, Central Building, Pune-411 001

B) Chief Planner, Maharashtra Industrial Development Corporation, Udyog Sarathi, Marol Industrial Area, Mahakali Caves road, Andheri (E), Mumbai- 400093.

The Notification shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in

**By order and in the name of Governor of Maharashtra,**

**(Pradeep Gohil)**
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीमधील तक्ता क्र. १९ मधील फेरबदल मंजूरीची कलम ३७(२) खालील अधिसूचना.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
दिनांक :- **२२** मार्च, २०१८.

**अधिसूचना**

**क्रमांक :- टिपीबी ४३१७ / ७०३/प्र.क्र. २०३/२०१७/ नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा केलेला आहे.)चे कलम ४० च्या पोटकलम १क अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६ च्या तरतदी लागू आहेत असे कोणतेही क्षेत्र व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास( यापुढे यांचा उल्लेख " उक्त महामंडळ" असा केलेला आहे) हस्तांतरण करण्यात आलेले शासकीय जमिनीचे क्षेत्र, या क्षेत्राकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण असेल असे मानण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महामंडळाने त्यांची विकास नियंत्रण नियमावली (यापुढे याचा उल्लेख "उक्त सुधारित विनियम" असा केलेला आहे) सुधारित केलेली आहे आणि ज्यास शासन नगर विकास विभागाकडील अधिूसचना क्र. टिपीबी-४३०८/ ४६५/प्र.क्र.६४/०८/नवि-११, दिनांक ३१ ऑगस्ट २००९ अन्वये मंजूरी दिलेली असून ती दिनांक २४ सप्टेंबर २००९ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महामंडळाने त्यांच्या ३६९ व्या बैठकीमध्ये दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी, ठराव क्र. ५५०९ अन्वये जैव तंत्रज्ञान उद्यान व माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या वाहनतळांच्या तरतूदीसंदर्भाने उक्त सुधारित विनियमाच्या, तक्ता क्र.१९ मध्ये सुधारणा करणेचे ठरविले आणि त्यानुसार दिनांक २३ ऑगस्ट २०१७ रोजीच्या पत्रान्वये फेरबदल प्रस्ताव ( यापुढे याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल" ) उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झालेले आहे ;

URBAN DEVELOPMENT DEPTT BAI-32

आता त्याअर्थी. उकत अधिनियमाचे कलम ३७ पोटकलम (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन शासन :-

अ) प्रस्तावित फेरबदल खाली उल्लेखिलेल्या परिशिष्टामध्ये नमूद असलेप्रमाणे मंजूर करीत आहे. माहिती तंत्रज्ञान व नॅनो तंत्रज्ञानासंदर्भातील अंतिम निर्णय प्रलंबित ठेवणेत येत असून त्यासबंधीची अधिसूचना स्वतंत्र काढणेत येईल.

ब) सदर अधिसूचना शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून फेरदबल अंमलात येईल.

क) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास सुधारित विनियम मंजूरीच्या अधिसूचनेच्या फेरबदलाच्या परिशिष्टामध्ये शेवटच्या नोदीनंतर, वरील (अ) प्रमाणे नोंद अंतर्भूत करणेचे निर्देश देत आहे.

## परिशिष्ट

| Existing Provision | | | Sanctioned Provision | | |
|---|---|---|---|---|---|
| Table 19 | | | Table 19 | | |
| Sr. No. | Land Use | Car Spaces | Sr. No., | Land Use | Car Spaces |
| 6 | Information Technology, Biotechnology and Nano Technology | One Space for every 50 Sq m of floor area or part thereof | 6 | Biotechnology | One space for every 100 sq m of floor area or part thereof |
| | | | In case of Information Technology & Nano Technology, the final decision is kept in abeyance. | | |

Note:- The parking norms for Datacenter activity shall be as per clause 11 of Table 19, i.e. as per storage activity.

प्रस्तुत अधिसूचना एक महिन्याचे कालावधीमध्ये अवलोकनार्थ खालील ठिकाणी उपलब्ध राहिल.

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालय, पुणे ४११ ००१.

२) मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, मरोळ औद्योगिक वसाहत, महाकाली गुंफा रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई ४०० ०९३.

सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार,व नावाने.

URBAN DEVELOPMENT DEPTT ... BAI-32

**( प्रदीप गोहिल )**

**शासनाचे अवर सचिव.**